महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्रं. (022) 24927631,
E-mail ID : dmainfo4@gmail.com

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत,
3 रा मजला,सर पोचखानवाला मार्ग,
वरळी, मुंबई – 400 030.

---

क्रमांक: क्र.नपप्रसं/आस्था/संचा-बळकटीकरण/२०१४/कक्ष-१ / 877

दिनांक :- /०२/२०२१
2 6 FEB 2021

प्रति,
प्रादेशिक उप संचालक (सर्व)
नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय.
( कोकण / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर )

**विषय :- नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या सुधारीत आकृतिबंधानूसार निरसित होणाऱ्या पदांवरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संदर्भात करावयाची कार्यवाही.**

**संदर्भ :-** १) शासन नगर विकास विभाग निर्णय क्र.एमसीओ-२०१९/प्र.क्र.१५/नवि-१४, दि.५/८/२०२०.
२) शासन नगर विकास विभाग पत्र क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.१५३/नवि-१४, दि.१९/११/२०२०.

उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील दि.५/८/२०२० च्या शासन नगर विकास विभाग निर्णयान्वये, नगरपरिषद प्रशासन मुख्यालय, विभाग व जिल्हा स्तरावरील सुधारीत आकृतिबंध मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच जुन्या आकृतिबंधातील निरसित करावयाच्या पदांवर कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे मुळ विभागात प्रत्यावर्तन करण्यासही या निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

०२. तसेच शासन नगर विकास विभागाने संदर्भाधीन क्र.२ येथील पत्र दि.१९/११/२०२० परिच्छेद क्र.३ अन्वये, संचालनालय व सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालयांना खालीलप्रमाणे सुचित केले आहे.

**निरसीत पदांऐवजी निर्माण करण्यात आलेल्या अन्य मंजूर पदांवर नियमित नियुक्त्या होईपर्यंत कार्यरत अन्य अधिकारी / कर्मचारी तात्पुरती व्यवस्था म्हणून तेथेच कार्यरत ठेवून त्यांच्या सेवा टप्प्या-टप्प्याने प्रत्यार्पित करणे अभिप्रेत आहे.**

शासन नगर विकास विभागाच्या सुचना स्वयंस्पष्ट आहेत. त्याप्रमाणे सर्व प्रादेशिक उप संचालक-नगरपरिषद प्रशासन यांनी तात्काळ कार्यवाही करुन, पुर्तता अहवाल शासन नगर विकास विभाग व संचालनालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी ही विनंती.

**मा.आयुक्त तथा संचालक यांच्या मान्यतेने**

( समीर उन्हाळे )
सह आयुक्त (राज्य मुख्यालय)
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई

प्रत -
मा.प्रधान सचिव(नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग-मुंबई- ४०० ०३२.- यांना माहितीस्तव अग्रेषित.

TIppni

Scanned with CamScanner